# विवेकसिंधु

## प्रस्तावना ( भाग १ )

विवेक सिंधुभीतरीं । जो जो मुमुक्षु अवगाहन करी ।
तयासि भेटे श्रीहरी । साक्षात्कारें ॥ विवे. प्र. ७ ओ. १५०
विवेकसिंधूचीं शब्दरत्नें । कंठीं धरिजेतिल प्रयत्नें ।
तरी जनकाचेनि महिमानें । श्लाघ्यता होये ॥
विवे. प्र. ७ ओ. १५१

सुमारें ६००।७०० वर्षांपूर्वी, मुकुंदराज हे एक मोठे साक्षात्कारी पुरुष होऊन गेले. त्यांनी " विवेकसिंधु " नांवाचा एक मराठी ओवीबद्ध ग्रंथ रचला. हा ग्रंथ अद्वैत वेदान्तपर असून, फार मोठ्या योग्यतेचा आहे. अशा हा श्रेष्ठ प्रतीचा ग्रंथ संपादन करण्याचा मी प्रयत्न केला आहे. त्याबद्दल थोडेसें प्रास्ताविक विवेचन, करतों.

हें विवेचन तीन भागांत करण्याचें योजलें आहे. एका भागांत सुरू ग्रंथाबद्दल जें काय सांगावयाचें आहे तें सांगून, दुसऱ्या भागांत ग्रंथकार मुकुंदराजाची थोडीशी माहिती सांगणार आहे, व तिसऱ्या भागांत आनुषंगिक कांहीं मुद्यांचा विचार करणार आहे.

## ' विवेकसिंधु ' ग्रंथाची फार हेळसांड झाली आहे.

ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, अशा तोडीचा हा ग्रंथ, महाराष्ट्रांत एकेकाळीं फार मान्यता पावला होता. ग्रंथ लहानसा सुमारें १७०० ओव्यांचा आहे, तरी ग्रंथाचा विषय अध्यात्मपर असून तो मुकुंदराजासारख्या थोर योगेश्वराच्या मधुर वाणींतून आला असल्यामुळें, सर्वांच्या आदरास व प्रेमास पात्र झाला होता बहुतेक सर्व मठांतून, व विद्याव्यासंगी गृहस्थांच्या जुन्या दप्तरांतून, त्या ग्रंथाच्या नकला करून ठेवलेल्या असत. कासार, न्हावी अशांकडे सुद्धां, या ग्रंथाच्या प्रती आढळलेल्या आहेत. इतक्या आदरानें एकेकाळीं जोपासलेला व अभ्यासिलेला, हा ग्रंथ, आजच्या समृद्ध मुद्रण कलेच्या या युगांत, दुर्मिळ झाला आहे. मोठमोठ्या मराठी पुस्तक विक्रेत्यांच्या दुकानांतहि तो विकत मिळत नाहीं. मोठमोठीं सार्वजनिक वाचनालयें जेथें जेथें आहेत तेथें तेथें शोध घेतां, पुस्तकांच्या यादींत,

या ग्रंथाचा नामनिर्देश क्वचितच आढळतो. ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रामदास या संतांच्या वाङ्मयाचे ग्रंथ अनेक ठिकाणीं अनेकांनीं छापले आहेत. विद्वान् अभ्यासक त्यांच्या ग्रंथांच्या अर्थाचें सूक्ष्म विवरण करीत आहेत. पाठ, पाठभेद, वगैरे बद्दल चिकित्सा होत असून शुद्ध ग्रंथ वाचण्यास मिळावा म्हणून, दीर्घ प्रयत्न चालले आहेत. पण त्याच मालिकेंत शोभण्यासारखा विवेकसिंधु ग्रंथ असूनहि, त्याची महाराष्ट्रानें हेळसांड होऊं दिली आहे याचें आश्चर्य वाटतें.

## विवेकसिंधूच्या छापील प्रती

छापलेल्या अशा विवेकसिंधूच्या तीन, निरनिराळ्या प्रती, मला पाहाण्यास मिळाल्या, त्यांची थोडीशी माहिती देतों.

### ( अ ) पुणें नगरवाचन मंदिरांतील प्रत

ही सन १८८४ सालांत, शिळा प्रेसवर, रा. रघुनाथ भास्कर गोडबोले यांचे साह्यानें, पुष्कळ प्रतीवरून शुद्ध करून, रा. रावजी श्रीधर गोंधळेकर यांनी आपल्या मालकीच्या जगद्धितेच्छु छापखान्यांत, दुसरी आवृत्ती, म्हणून छापलेली आहे. याला एक कठीण शब्दांचा कोश जोडलेला आहे. या प्रतीची जी पहिली आवृत्ति, सुमारें ८।१० वर्षे आधीं म्हणजे १८७५ चे सुमारास, छापली असेल तीच प्रथमची विवेक सिंधूची मुद्रित कृति असावी. मला पहाण्यास मिळालेली, ही पोथीवजा प्रत, सुमारें ६७ वर्षांची जुनी आहे. ही प्रत कोणत्या व कोठल्या प्रतीवरून शुद्ध केली याबद्दल खुलासा पोथींत नाहीं.

### ( ब ) आठल्ये यांची प्रत

शके १८३३ म्हणजे सुमारें चाळीस वर्षांपूर्वी, रा. रा. विष्णु कृष्ण आठल्ये यांनी तयार केलेला, व त्यांचेपासून सर्व हक्कांसह श्री. गजानन चिंतामण शास्त्री देव यांनी विकत घेऊन, पुण्याच्या गोंधळेकरांच्या भारतभूषण प्रेसमध्यें छापवून प्रसिद्ध केलेला," सार्थ विवेकसिंधु " ग्रंथ, मागें बाजारांत मिळत असे. पण आतां तो हि मिळत नाहीं. ह्या ग्रंथाला प्रस्तावना, निवेदन पुरस्कार वगैरे कांहीं एक जोडलेलें नाहीं. दोन पानांची अनुक्रमणिका होतांच ग्रंथाला सुरवात झालेली आहे. यामुळें कोणत्या जुन्या पुस्तकांच्या अथवा हस्तलिखित पोथ्यांच्या आधारें, त्यांनीं ग्रंथ तयार केला, त्यांतील पाठांची योग्यता काय आहे, वगैरे समजण्याला कांहींच साधन नाहीं. पानाच्या वरील अर्ध्या भागांत मूळ, व खालीं त्याचा अर्थ, अशी मांडणी त्यांनीं केली आहे. श्री. आठल्ये चांगले व्युत्पन्न असावे असें, त्यांच्या अर्थ लावण्याच्या पद्धतीवरून दिसतें.

परंतु ग्रंथ होईल तितका शुद्ध स्वरूपांत प्रसिद्ध व्हावा, याकडे त्यांनी फारसें लक्ष दिलेलें नाही. व त्यामुळें कांही ठिकाणीं मूळ अर्थाचा अनर्थ झाले प्रतींत झालेला आहे. थोडीं उदाहरणें देऊन हें स्पष्ट करतों.

## उदाहरणें ५

( १ ) प्रकरण २ ओवी १ आठल्ये प्रतींत आहे ती अशीः—

तव सखी स्वानुभूतीची । तुर्या पातली निजाची ।
तिया प्रबोधीं लाहे ज्याची । तो योगिराज ॥ १ ॥

या प्रकरणाच्या आधीच्या पहिल्या प्रकरणाच्या शेवटीं, शिष्य गुरुप्रसादानें केवळ स्वस्वरूप सुखांत बुडून गेला, असा विवेचनाचा भाग आला आहे. त्यानंतर तो तुर्यावस्थेतून हळुहळु पुढील अवस्थेवर येऊं लागला हें सांगण्यासाठीं प्रकरण २ ची सुरवात आहे. अशा ठिकाणीं "प्रबोधीं लाहे ज्याची" या शब्दांनीं कांहींच अर्थबोध होत नाहीं, व अडचण उत्पन्न होते. अशुद्ध पाठामुळें हा घोटाळा होतो.

शुद्ध व सरळ पाठ आढळला तो असाः—

तिया प्रबोधिला हेळाचि तो योगिराजु

( २ ) प्रकरण २ ओवी ३ आठल्ये प्रतींत आहे ती अशीः—

इंद्रियें कीं रचियेलीं । परी तयांची धाव मोडिली ।
पुनरपि बुचकळली । तये आनंदजळीं ॥ ३ ॥

या ठीकाणीं 'इंद्रियें रचणें' याचा अर्थ काय करावयाचा याची पंचाईत पडते. शुद्ध व सरळ पाठ आढळतो तो असा.

"इंद्रियें कीं चेइलीं"

या पाठानें इंद्रियें कार्यक्षम झाली हें नीट लक्षांत येतें.

( ३ ) प्रकरण ४ ओवी ५८ आठल्ये प्रतींत आहे ती अशीः—

पुत्रकलत्र स्नेह दांत । यम दाढा उग्गत ।
वरुण लोक विख्यात । ते जिव्हा जाणावी ॥ ५८ ॥

( या प्रतींत ही ओवी प्र. ४ ओवी ५१ आहे )

ही ओवी ईश्वराच्या विराट देहाच्या वर्णनाच्या 'सप्त पाताळ ते चरण । ज्योतिर्लोक तें वक्षस्थळ । इंद्रलोक ते हात ।......' अशा ज्या १०७ ओव्या आहेत, त्यांत आलेली आहे. अशा प्रकारच्या वर्णनांत "पुत्र कलत्राचा" काय संबंध ? कोणा नकलकाराला, जशी वाचता आली तशी ती ओवी त्यानें उतरली, व श्री. आठल्ये यांनी ती प्रामाणिकपणें आपले प्रतींत सामिल केली. व तिचा

या ग्रंथाचा नामनिर्देश क्वचितच आढळतो. ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रामदास या संतांच्या वाङ्मयाचे ग्रंथ अनेक ठिकाणीं अनेकांनीं छापले आहेत. विद्वान् अभ्यासक त्यांच्या ग्रंथांच्या अर्थाचें सूक्ष्म विवरण करीत आहेत. पाठ, पाठभेद, वगैरे बद्दल चिकित्सा होत असून शुद्ध ग्रंथ वाचण्यास मिळावा म्हणून, दीर्घ प्रयत्न चालले आहेत. पण त्याच मालिकेंत शोभण्यासारखा विवेकसिंधु ग्रंथ असूनहि, त्याची महाराष्ट्रानें हेळसांड होऊं दिली आहे याचें आश्चर्य वाटतें.

## विवेकसिंधूच्या छापील प्रती

छापलेल्या अशा विवेकसिंधूच्या तीन, निरनिराळ्या प्रती, मला पाहाण्यास मिळाल्या, त्यांची थोडीशी माहिती देतों.

### ( अ ) पुणें नगरवाचन मंदिरांतील प्रत

ही सन १८८४ सालांत, शिळा प्रेसवर, रा. रघुनाथ भास्कर गोडबोले यांचे साहायानें, पुष्कळ प्रतीवरून शुद्ध करून, रा. रावजी श्रीधर गोंधळेकर यांनी आपल्या मालकीच्या जगद्धितेच्छु छापखान्यांत, दुसरी आवृत्ती, म्हणून छापलेली आहे. याला एक कठीण शद्बांचा कोश जोडलेला आहे. या प्रतीची जी पहिली आवृत्ति, सुमारें ८।१० वर्षे आधीं म्हणजे १८७५ चे सुमारास, छापली असेल तीच प्रथमची विवेक सिंधूची मुद्रित कृति असावी. मला पहाण्यास मिळालेली, ही पोथीवजा प्रत, सुमारें ६७ वर्षांची जुनी आहे. ही प्रत कोणत्या व कोठल्या प्रतीवरून शुद्ध केली याबद्दल खुलासा पोथींत नाहीं.

### ( ब ) आठल्ये यांची प्रत

शके १८३३ म्हणजे सुमारें चाळीस वर्षांपूर्वी, रा. रा. विष्णु कृष्ण आठल्ये यांनी तयार केलेला, व त्यांचेपासून सर्व हक्कांसह श्री. गजानन चिंतामण शास्त्री देव यांनी विकत घेऊन, पुण्याच्या गोंधळेकरांच्या भारतभूषण प्रेसमध्यें छापवून प्रसिद्ध केलेला, " सार्थ विवेकसिंधु " ग्रंथ, मागें बाजारांत मिळत असे. पण आतां तो हि मिळत नाहीं. ह्या ग्रंथाला प्रस्तावना, निवेदन पुरस्कार वगैरे कांहीं एक जोडलेलें नाहीं. दोन पानांची अनुक्रमणिका होतांच ग्रंथाला सुरवात झालेली आहे. यामुळें कोणत्या जुन्या पुस्तकांच्या अथवा हस्तलिखित पोथ्यांच्या आधारें, त्यांनीं ग्रंथ तयार केला, त्यांतील पाठांची योग्यता काय आहे, वगैरे समजण्याला कांहींच साधन नाहीं. पानाच्या वरील अर्ध्या भागांत मूळ, व खालीं त्याचा अर्थ, अशी मांडणी त्यांनीं केली आहे. श्री. आठल्ये चांगले व्युत्पन्न असावे असें, त्यांच्या अर्थ लावण्याच्या पद्धतीवरून दिसतें.

परंतु ग्रंथ होईल तितका शुद्ध स्वरूपांत प्रसिद्ध व्हावा, याकडे त्यांनीं फारसें लक्ष दिलेलें नाहीं. व त्यामुळें कांहीं ठिकाणीं मूळ अर्थाचा अनर्थ झाले प्रतींत झालेला आहे. थोडीं उदाहरणें देऊन हें स्पष्ट करतों.

उदाहरणें ५

( १ ) प्रकरण २ ओवी १ आठल्ये प्रतींत आहे ती अशीः—

तव सखी स्वानुभूतींची । तुर्या पातली निजाची ।
तिया प्रबोधीं लाहे ज्याचीं । तो योगिराज ॥ १ ॥

या प्रकरणाच्या आधीच्या पहिल्या प्रकरणाच्या शेवटीं, शिष्य गुरुप्रसादानें केवळ स्वस्वरूप सुखांत बुडून गेला, असा विवेचनाचा भाग आला आहे. त्यानंतर तो तुर्यावस्थेतून हळुहळु पुढील अवस्थेवर येऊं लागला हें सांगण्यासाठीं प्रकरण २ ची सुरवात आहे. अशा ठिकाणीं " प्रबोधीं लाहे ज्याची " या शब्दांनीं कांहींच अर्थबोध होत नाहीं, व अडचण उत्पन्न होते. अशुद्ध पाठामुळें हा घोटाळा होतो, शुद्ध व सरस पाठ आढळला तो असाः—

तिया प्रबोधिला हेळाचि तो योगिराजु

( २ ) प्रकरण २ ओवी ३ आठल्ये प्रतींत आहे ती अशीः—

इंद्रियें कीं रचियेलीं । परी तयांची धाव मोडिली ।
पुनरपि बुचकळली । तये आनंदजळीं ॥ ३ ॥

या ठीकाणीं ' इंद्रियें रचणें ' याचा अर्थ काय करावयाचा याची पंचाइत पडते. शुद्ध व सरस पाठ आढळतो तो असा.

" इंद्रियं कांहं चेइलीं "

या पाठानें इंद्रियें कार्यक्षम झालीं हें नीट लक्षांत येतें.

( ३ ) प्रकरण ४ ओवी ५८ आठल्ये प्रतींत आहे ती अशीः—

पुत्रकळत्र स्नेह दांत । यम दाढा उन्नत ।
वरुण लोक विख्यात । ते जिव्हा जाणावी ॥ ५८ ॥

( या प्रतींत ही ओवी प्र. ४ ओवी ५१ आहे )

ही ओवी ईश्वराच्या विराट देहाच्या वर्णनाच्या ' सप्त पाताळ ते चरण । ज्योतिर्लोक तें वक्षस्थळ । इंद्रलोक ते हात ।......' अशा ज्या १७ ओव्या आहेत, त्यांत आलेली आहे. अशा प्रकारच्या वर्णनांत " पुत्र कलत्राचा " काय संबंध ! कोणा नकलकाराला, जशी वाचतां आली तशी ती ओवी त्यानें उतरली, व श्री. आठल्ये यांनीं ती प्रामाणिकपणें आपले प्रतींत सामील केली. व तिचा

वर्षांपूर्वीच्या ग्रंथाची अशी प्रत सापडेल, अशी आशा करणेंहि बरोबर नाहीं. सच्चिदानंद बाबा, जिचे आदर्श लेखकु झाले, ती ज्ञानेश्वरीचीप्रत उपलब्ध न झाल्यामुळें नाथांना शुद्ध प्रत तयार करण्याचे प्रयास करावेच लागले. हें आपण पाहातोंच. अशा स्थितींत ' शुद्धप्रत ' याचा अर्थ ' बरीचशी शुद्ध ' अशी प्रत असाच संकुचित करावा लागतो. पूर्वी मुद्रणालयाची सोय नसल्यामुळें मौल्यवान् ग्रंथांच्या नकला करून ठेवण्याची प्रथा अवलंबावी लागे. व मागणी तसा पुरवठा, या न्यायानें ग्रंथ नकलणारांचा एक वर्गच अस्तित्वांत त्यामुळें आला होता. द्रव्य घेऊन नकल करणारे, किती आस्थेनें नकला करीत असतील याची कल्पना केलेलीच बरी. या नकलकाराबद्दल इतिहासाचार्य राजवाडे लिहितात- " नकलकारांचा धंदा करणारे, प्रायः भाषेचे शास्त्रीय अभ्यासक नसतात, तेव्हां जुनी भाषा जशीच्या तशी राखण्याकडे त्यांचे लक्ष नसतें. त्यांचें एकच लक्ष, फक्त मजकुराकडे असतें. मजकुराची जुनी भाषा डोळ्यांनीं पाहावयाची व तिचा उच्चार स्वकालीन भाषेप्रमाणें तोंडातल्या तोंडांत जिभेनें करून, ती नकलत झालेली अर्वाचीन भाषा हातानें लिहावयाची, हा परिपाठ महाराष्ट्रांतील नकलकारांचा सर्वत्र दृष्टीस पडतो " ( महिकावतीची बखर प्रस्तावना पान ७ )

तसेंच ह. भ. पांगारकर लिहितातः—

मूळ ग्रंथ जसे लिहिले गेले, तसेच्या तसेच, आज मिळणें जवळ जवळ दुरापास्त आहे. ग्रंथांच्या नकला व त्या नकलांच्या पुन्हां, नकला असें होत होत प्रत्येक नकलकाराच्या व्युत्पन्नतेप्रमाणें किंवा आवडीप्रमाणें, शुद्धलेखन, प्रत्यय, काना मात्रा दीर्घऱ्हस्व इत्यादिकांत कालमानाप्रमाणें फरक होत होत मागील शतकांतल्या प्रती आपणापर्यंत आल्या आहेत. ( पांगारकर कृत मराठी वाङमयाचा इतिहास खंड पहिला पान ३८१ ) अशा नकलकारांच्या हातून लिहून घेतलेल्या प्रती वरून शुद्धाशुद्धतेचा निकाल देणें हें धाडसाचें काम आहे. क्वचित एखादा साक्षेपी, विद्वान, व आस्थेवाईक शिष्य काळजीपूर्वक नकल करणाराहि आढळतो, व अशल्या नकलेचा चांगला आधार मिळतो म्हणून, जितक्या मिळवितां येतील तितक्या प्रती मिळवून त्या अपूर्ण, त्रुटित, कशाहि असल्या तरी ग्रंथाच्या सर्व प्रती बारकाईनें ताडून पाहाणें अवश्य होतें.

श्री. नानासाहेब देवांनीं ४५-५० वर्षे निरनिराळ्या ठिकाणच्या रामदासी मठांचें संशोधन करून, जुन्या दुर्मिळ अशा हस्तलिखित ग्रंथांचा धुळें येथील वाग्देवतामंदिरांत मोठा संग्रह करून ठेविला आहे. त्यांत विवेकसिंधूच्या बीड, शिरगांव, इंदूरबोधन, तंजावर, चांफळ, तिसगांव, एकंदेळी, जांब, परळी आपचंद, गुंज, वगैरे मठांतून मिळालेल्या अशा एकंदर अठरा प्रती आहेत. त्याचप्रमाणें धुळ्यांतील राजवाडे संशोधन मंदीरांतही, राजवाडे यांनीं मिळविलेल्या

दाहा प्रती आहेत. इतक्या प्रती, आयत्याच एके शहरीं असल्यामुळें व त्यांचा उपयोग करूं देण्याची तेथील अधिकारीवर्गानें कृपेनें परवानगी दिल्यामुळें, पुष्कळच सामुग्री मला आयतीच मिळाली. धुळें वा. दे. मं. त विवेकसिंधूच्या पोथ्याशिवाय (१) मुकुंदमुनीराजकृत 'विवेकसिंधु तात्पर्य' नांवाचें (११७१ क्रमांकाचें) बाड, व (२) 'विवेकसिंधु परिभाषा' या नांवाचें (१०४५ क्रमांकाचें) बाड, अशी आणखी दोन बाडें आढळलीं. बाडांक ११७१ वरून विवेकसिंधूंतील पंचीकरणाचा भाग व बाडांक १०४५ वरून कांहीं जुन्या अपरिचित शब्दांचा अर्थ समजण्यास बरीच मदत झाली.

पुणें येथील भारत-इतिहास-संशोधक मंडळाच्या संग्रहीं अशाच आणखी विवेकसिंधूच्या पोथ्या आढळतील म्हणून तेथें शोध घेतला परंतु तेथें १:२ प्रतीच पाहाण्यास मिळल्या, बाकीच्या मुंबई मराठी—ग्रंथ—संग्रहालयाकडे दिल्याचें समजलें. या शिवाय इतरत्र विवेकसिंधूच्या जुन्या पोथ्या असतील हि, परंतु त्या हस्तगत होऊन, त्या सर्वांचा उपयोग करून घेता येणें बऱ्याच त्रासाचे होतें म्हणून हातीं असलेली सामग्री काय थोडी झाली, असें वाटून व वयाच्या ८० व्या वर्षी अनेक ठिकाणीं जाऊन प्रयत्न करणें अशक्य वाटून व या प्रयत्नाला शेवट नाहीं हें जाणून, अल्प संतुष्टतेचा दोष पत्करून मी त्याचा नाद सोडून दिला. वाग्देवतामंदिरांतील अठरा पोथ्यांपैकीं कांहीं अपूर्ण, त्रुटित, फाटक्या, चिकटलेल्या अशा आहेत. तथापि अशाहि पोथ्यांच्या अवशिष्टभागांतून पाठांतरें पाहाण्यास उपयोग करून घ्यावा लागतोच. समग्र अशा त्या पैकीं सहा पोथ्या असल्यामुळें अथपासून इतिपर्यंत त्यांचे आधारें तपासणी करतां आली. राजवाडे संशोधन मंदिरांतसुद्धां समग्र अशा चारच पोथ्या आहेत, त्यांचा हि उपयोग करून घेतला.

सारांश वा. दे. मं. तील अठरा पोथ्या, रा. सं. मं. तील दहा पोथ्या अशा एकूण २८ पोथ्या व वर उल्लेखिलेलीं ११७१ व १०४५ चीं बाडें व म. म. पाठक शास्त्री यांनी संपादिलेला मुकुंदमुनकृत 'महाभाष्य ग्रंथ व त्याच महाभाष्याची कारंजे मठांतील आणखी एक हस्तलिखित पोथी येवढी सामग्री प्राप्त झाली, व विवेकसिंधूची नवी प्रत काढण्यास, ती तूर्त पुरेशी आहे असें मला वाटलें व मी प्रत तयार करण्याचे कामास लागलों.

## कोणत्या पोथीला अग्रपूजेचा मान द्यावा ?

पाठांतरें व शुद्धाशुद्धता ठरविण्यास, इतक्या निरनिराळ्या पोथ्या उपलब्ध आहेत तरी, कोणत्या पोथीला अग्रपूजेचा मान देऊन तिच्याशीं ताडून, पाठांतरें वगैरे ठरवावीं, हा प्रश्न उभा राहिलाच. व सर्वच पोथ्या कमी अधिक प्रमाणांत

अशुद्ध असल्यामुळें, या प्रश्नाचें उत्तर देणें सोपें नव्हतें. एकंदर पोथ्यांपैकी समग्र आहेत, अशा पोथ्यांचें बाडांक व शक पुढीलप्रमाणें आहेत. बाडांक वा. दे. मं. चे आहेत, व शक नकलकारांनीं नकला केव्हां केल्या त्याचे आहेत.

| ४०१ | ४९३ | ५५७ | ८७० | १०४३ |
|---|---|---|---|---|

शके १७०५, ज्येष्ठ शु. १३ श.१५७८, १५० वर्षांपूर्वीची, श.१६१४, श.१६१५

११८१

८० वर्षांपूर्वीची

राजवाडे मंदिरांतील ४ संपूर्ण पोथ्यांचें अंक व शक येणेप्रमाणे क्रमांक

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १७६३ | १६३० | उल्लेख नाही | उल्लेख नाही |

साधारणतः जुन्या हस्तलिखित पोथ्यांचा अगर कागदपत्रांचा अभ्यास करणारांचा, असा अलिखित दण्डक आहे कीं, लेख जितका जुना तितका तो ज्यास्त विश्वासार्ह.या नियमासअनुसरून, बाडांक४९३ च्या विवेकसिंधुच्या प्रतीस, अग्रपूजेचा मान दिला. व तो मान अनाठायीं दिला गेला नाहीं. असें मानण्यासही दोन कारणें आहेत.

## पहिलें कारण

### दासविश्रामधामांतील उल्लेख

श्रीसमर्थ सांप्रदायांतले आत्माराम महाराज, यांनीं दासविश्रामधाम नांवाचा जो प्रचंड ग्रंथ लिहिला आहे, व जो सत्कार्योत्तेजक सभेनें चार भागांत छापला आहे, त्याच्या २६ व्या प्रकरणांत, असा कथाभाग आहे कीं, इंदूरबोधन मठांत उद्धवबुवांची स्थापना करून, नंतर जोगाईच्या आंब्याकडे समर्थ जात असतां वाटेंत ' बुटे ' टेकडीवर त्यांचें वास्तव्य झालें. त्यावेळीं, मुकुंदराजांची शिष्यमंडळी तेथें होती. त्यांचेजवळ मुकुंदराजांचा ' विवेकसिंधु ' होता. तो समर्थांनी अवलोकन केला. अनेक वर्षें आधीं होऊन गेलेल्या मुकुंदराजांची भेट व्हावी, असें समर्थांच्या मनांत आलें. " तेव्हां मुकुंदराज पातले भेटीस " त्या भेटींत जो हर्ष जाला तो अनुभवी पुरुषास ठाऊक. समर्थांच्या हातांत मुकुंदराजांनीं विवेकसिंधूचें श्रेष्ठ धन दिलें व म्हणाले—

" आद्युद ग्रंथ हा सिंधु सरसा । विस्तार सांत्रा करेक तैसा ।
ग्रंथ स्वमतीनें रचावा ॥ "

( दा. वि. धाम प्रकरण २६ ओव्या ११८-१२४ ) पान १२१

'तथास्तु' म्हणून समर्थांनी ग्रंथाचा स्वीकार केला. या कथानकावर कोणाचा विश्वास बसो अथवा न बसो, पण त्यावरून असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही की, विवेकसिंधु ग्रंथ समर्थांचे पाहण्यांत आला होता, व बाडांक ४९१ ची प्रत शके १५७८ ज्येष्ठ शुद्ध ११ ला नकललेली मिळालेली आहे. ही समर्थ काळी होती. इंदूर बोधनच्या परिसरात, एक विवेकसिंधूची प्रत समर्थांनी पाहिली असा दा. वि. भा. त उल्लेख आहे कदाचित ती बाडांक ४९१ चीच प्रत असून समर्थांच्या हस्तस्पर्शानें पवित्र झालेली असावी ती असेल हि. ( या प्रतीच्या शेवटच्या पत्राचा फोटो सोबत दिला आहे )

# दुसरें कारण

## अधिक ओवीसंख्या

आणखी एक बाबहि लक्षांत घ्यावी लागली ती अशी कीं, या संपूर्ण अशा सहा बाडांत एकंदर ओवी संख्या सारखी नाही. बाडांक ४९१ मध्यें १६८४ ही जी सर्वांत जास्त संख्या, ती असल्यामुळें हत्तीच्या पावलांत सर्व जनावरांचीं पावलें मावतात, या न्यायानें, बाडांक ४९१ ला महत्व देणें योग्य होतें. प्रत्येक बाडांकाची ओवी संख्या अशी:—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४०१ | ४९१ | ५७७ | ८७० | १०४३ | ११८३ |
| ओंवी १६७२ | १६८४ | १६६५ | १६६० | १६२५ | १६६२ |

रा. आठल्याचे प्रतींत एकंदर ओव्या १६७२ आहेत.

### पाठ पाठांतरें अनंत आहेत.

विवेकसिंधूच्या ओव्या जेम तेम सरासरी. परंतु आम्हांस मिळालेल्या पोथ्यापुरतें पाहिलें तरी, एका प्रतींतील दुसऱ्या प्रतीशीं तंतोतंत शब्दशः जुळतील असा, पांच ओव्या काढून द्या, असें कोणी म्हणाल्यास तसें करणें हि शक्य नाहीं मुकुंदराजानंतर सुमारें ३०० । ३५० वर्षांनीं, व नंतर, नकललेल्या अशा या पोथ्या आहेत. तेवढ्या काळात भाषेत कितीतरी स्थित्यंतरें झाली. आणि अशा स्थित्यंतरांतून, आणि वर ज्याचा उल्लेख आला आहे अशा नकलकारांच्या हातून आलेल्या या पोथ्यांतून, एकें ओव्या शब्दशः एकसारख्या राहाणें शक्य नाहीं. अनेक पाठांतरें होणें अपरिहार्य आहे. भारताचार्य चिं. वि. वैद्य यांनी, आपल्या Riddle of the Ramayana या पुस्तकांत मूळच्या वाल्मीकि-रामायणाच्या श्लोकांचे कसे अनंत पाठभेद झाले, श्लोकांचे संख्येंत कशी बढघट झाली, मुंबई प्रत व गौड प्रत अशा प्रती कशा झाल्या वगैरेबद्दल जें विवेचन केलें आहे तेंच पोथ्यांना प्रमाणांत

येथेंहि लागू पडण्यासारखें आहे. तोंडातोंडी पाठ होऊन, पुढें पिढ्यांमागून पिढ्यांत भारताच्या अनेक भागांत प्रसृत झालेल्या रामायणाचे, नाना पाठभेद होणें अपरिहार्य होतें. लवांकुशांनीं रामाच्या यज्ञांत गाइलेलें रामायण आज आपण वाचतों आहोंत अशी भावना धरून आपण चाललों आहोंत एवढेंच.

अशा स्थितींत ग्रंथकर्त्यानें केलेलें विषयांचें विवेचन, नीटपणें संदर्भाला धरून स्पष्ट होईल, असा जो पाठ असेल तोच तारतम्यानें योग्य म्हणून ठरवून तो ग्राह्य मानणें, अगर पाठांतर म्हणून संकलित करून घेणें, यावांचून गत्यंतर नाहीं. नाहींतर एका ओवीची ६।७प्रतींत ऱ्हस्व दीर्घ, कान्हा मात्रा, अनुस्वार वगैरे धरून २५।३० पाठांतरें हि होऊं शकतील. तितक्या सर्वांचा समावेश करीन म्हटल्यास, वेडेपणाचें व आग्रहाचें ठरेल. अग्रपूजेचा मान मिळालेली ४९३ बाडाची प्रत सर्वतोपरी शुद्ध आहे असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं. त्यांतहि अनेक अशुद्धें आहेत.

अशास्थितींत शुद्धाशुद्धतेचा विचार करून, व अनेक पाठांतराचा परामर्श घेऊन ग्रंथकर्त्याच्या हेतूचें नीट आविष्करण होईल, असे पाठ निवडून, ज्याला विश्वनीय प्रत, निदान तितक्या योग्यतेची प्रत ( Veronium Edition ) तयार करण्यास हल्लींची वेळ योग्य आहे, असें वाटतें. तितकेंच कार्य पुढें नेल्या सारखें तरी त्यामुळें होईल.

## निरनिराळ्या पोथ्यांत आढळलेले ठळक फरक

### ( १ ) प्रकरणाच्या क्रमाचे आकडे

विवेकसिंधूची एकंदर प्रकरणें अठरा आहेत. कांहीं पोथ्यांतून याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग करून प्रकरण १ ते ७ यांचा पूर्वार्धांत समावेश केला आहे व पुढील प्रकरणाचा उत्तरार्धांत समावेश करून त्यांना एक पासून अकरा-पर्यंत क्रमांक दिले आहेत. परंतु कांहीं पोथ्यांतून १ ते १८ पर्यंत एकसारखे क्रमांक दिले आहेत. हा क्रमांकाचा फरक, कोणी तरी सोईसाठीं केला असण्याचा संभव आहे. मूळग्रंथांत मुकुंदराजांनीं, पूर्वार्ध व उत्तरार्ध असे भाग केले होते, असें प्र.७ ओवी १५३ व प्रकरण ८ ची ओवी ४ यावरून दिसतें. त्यांनीं दोन भाग केले हें उघड आहे. पण प्रकरणांचे क्रमांक १ ते १८ घातले, अगर १ ते ७ व पुनः १ ते ११ घातले, हें समजण्यास मार्ग नाहीं, असो हा कांहीं मोठा महत्वाचा प्रश्न नाहीं.

### ( २ ) सत्रावें प्रकरण दोन तऱ्हेचें

ग्रंथांतलें अनुक्रमानें १७ वें, म्हणजे उत्तरार्धांतलें प्रकरण १० यें याकडे विशेष लक्ष देणें जरूर आहे. " सच्चिदानंद- पदत्रय- व्याख्यान '

असें या प्रकरणाचें नांव आहे. या प्रकरणाची ओवीसंख्या निरनिराळ्या पोथ्यांत निरनिराळी आहे. एवढेंच नव्हे तर विषयाचें विवेचन दोन निराळ्या प्रकारचें आहे. विवेचनाचे दृष्टीनें त्याचे दोन गट पाडतां येतात. एका गटांत ३७ ते ४१ ओव्या आढळतात व दुसऱ्या गटांत ५१ ते ५८ ओव्या आढळतात. धारदे. मं. तील बाडांक ४०३, ५५७, ८७०, १०४३ यांत अनुक्रमें ३७, ४०, ३७, ३७ अशा ओव्या असून बाडांक ४०३ व ११८१ यांत अनुक्रमें ५१, अशा ओव्या आहेत. राजवाडे मंडळांतील क्रमांक १ चे पोथींत ५८ ओव्या आहेत बाकीच्यांत ३७, ३९, ४१ अशा आहेत. या १७ व्या प्रकरणासंबंधानें, पुढें एका ठिकाणीं, ऊहापोह करावयाचा आहे व अनुमानें काढावयाचीं आहेत, - तीं नीट समजण्यासाठीं एका गटास ( अ ) व दुसऱ्यास ( ब ) प्रकरण, अशीं नांवें देऊं. हल्लींच्या ग्रंथांत दोन्ही समाविष्ट केलीं आहेत.

## ( ३ ) ओव्यांचा कमीजास्तपणा

( अ ) प्रकरण ४ यांत प्रथमच्या ६ ओव्यानंतर कांहीं पोथ्यांतून ७ ते १३ अशा ' भस्मकंदाबद्दल ' ७ ओव्या आहेत, त्या कांहीं पोथ्यांतून अजिबात गाळल्या आहेत

( ब ) शेवटलें १८ वें प्रकरण यांत ' लोकांतीं एकांत व " " व एकांतीं लोकांत " यावर रचलेल्या १४ ओव्या ( १०७ ते १२० ) कांहीं पोथ्यांतून मुळींच गाळून टाकल्या आहेत.

( क ) क्वचित् एखादी ओवी सबंद गाळलेली आहे असेंहि आढळतें.

( ड ) क्वचित् नकलकाराचे दुर्लक्ष झाल्यामुळें ओवीचा क्रमांक चुकतो. मागील ओवी ७२ झाली तर पुढील ओवीला आकडा ७३ न घालतां ७५ घातला जातो व ती चूक प्रकरण अखेरपर्यंत तशीच टिकून राहाते.

वर दर्शविल्या कारणामुळें प्रत्येक पोथीची ओवी संख्या वेगळीच भरते, १६३९ ते १६८४ या दोन आकड्यांचे दरम्यान म्हणजे ४५ ओव्यांचा चढउतार आढळतो. असे हे फरक कां पडले हें सांगणें कठीण आहे. नकलकाराच्या हलगर्जीपणावरच सर्व भिस्त ठेवणें, बरोबर होणार नाहीं. कांहीं ओव्या प्रक्षिप्त असतील व कांहीं ठिकाणीं ओव्या उलगडत नाहीं म्हणून गाळल्याहि गेल्या असतील. एकंदरीत, या प्रश्नाचें निश्चित उत्तर इतक्या काळानंतर देणें अशक्य आहे.

असो. येथपर्यंत विवेकसिंधूबद्दल जें विवेचन केलें त्यांत त्या ग्रंथाबद्दल पूर्वी असलेला आदर, हल्लीं होत असलेली हेळसांड, ग्रंथाचें अशुद्ध स्वरूप, छापील प्रतीचें मूल्यमापन, शुद्ध ग्रंथाची आवश्यकता, त्या दृष्टीनें चालू झालेला

प्रयत्न, ग्रंथासाठीं मिळालेली सामग्री, तिचा तारतम्यभावानें पाठपाठांतरासाठीं उपयोग, शके १५७८ तील बाडांक ४९३ चे प्रतीस दिलेलें प्राधान्य, पोथ्यांतून दिसणारे ओव्यांचे वगैरे फरक, इत्यादि गोष्टींचा थोडक्यांत विचार केला. आतां विवेकसिंधु या ग्रंथाची योग्यता काय तें थोडक्यांत पाहूं.

## विवेकसिंधूची योग्यता

या मुद्याचें विवेचन ( १ ) ग्रंथकर्त्याचा अधिकार, ( २ ) ग्रंथाचा विषय, ( ३ ) विवेचनपद्धति, ( ४ ) ग्रंथाची भाषा या चार दृष्टींनीं करणें अवश्य वाटतें.

### ( १ ) ग्रंथकर्ते मुकुंदराज यांचा अधिकार

वन्दन नंदनसा मी करितों भावें मुकुंदराजाला ।
वश झाल्या सद्विद्या सत्कीर्ति सुमुक्ति सुंदरा ज्याला ॥

मोरोपंतांची सन्मणिमाला

मुकुंदराज हे वेदवेदांतपारंगत, साक्षात्कारी, ब्रह्मज्ञानी, श्रेष्ठ गुरुपरंपरेचे व अनुभवी सत्पुरुष होते. त्यांना स्वस्वरूपाचा अनुभव झाला असल्यामुळें स्वानंदसाम्राज्यांत तें निमग्न असत. आपल्या ब्रह्मानंदांत इतरांना वाटेकरी करावें, अशा परोपकार बुद्धीनें प्रेरित होऊन त्यांच्या हातून ग्रंथरचना घडली आहे.

धालेपणाचे ढेकर । जेवीं देती जेवणार ।
तैसे स्वरूपाचे उद्गार । बोलविती मजकरवीं । प्र. १।१०

असे ते सांगतात. ज्या ग्रंथाच्या निर्मितीला अशा अधिकारी पुरुषाची स्वयंस्फूर्ती कारण झाली, त्या ग्रंथाची योग्यता फार श्रेष्ठ असलीच पाहिजे.

### ( २ ) ग्रंथाचा विषय

ग्रंथांतील १८ प्रकरणांत कोणकोणते मुख्य विषय प्रतिपादिले आहेत. याची कल्पना प्रत्येक प्रकरणाच्या आरंभीं थोडक्यांत दिलेल्या यादीवरून लक्षांत येण्यासारखी आहे. अनुक्रमणिकेवरून हि हें स्पष्ट होणार आहे. या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणाच्या १०० ते १०४ या ओव्यांत, शिष्यानें गुरुंना प्रश्न विचारले आहेत. त्यावरून ग्रंथाची कल्पना नीट थोडक्यांत होऊं शकते. त्या ओव्या अशा:—

तंव शिष्यें विनाविलें । जी आवडे काय बोलिलें ।
ब्रह्म तें नांव ठेविलें । कवणासी जी ॥ १०० ॥
परमात्मा तो कवणु । सगुण किंवा निर्गुणु ।
तो कैसा विलक्षणु । सांगावें जी ॥ १०१ ॥
माया ते कवणाची शक्ति । तिची कैसी स्वरूपस्थिती ।
अविद्येची कैसी रीती । किमात्मक ते ॥ १०२ ॥

हा प्रपंचु कवणें निर्मिला । कासयाचा उभारला ।
जीवासी संसार नाथिला । तो कवणा निमित्त ॥ १०३ ॥
जी हे प्रश्न निरोपावे । माझे मनोरथ पुरवावे ।
मातें सर्वज्ञ करावें । कृपाबुद्धि ॥ १०४ ॥

वरील ओव्यांत निर्दिष्ट केलेल्या मूलगामी प्रश्नांचा व जीव सृष्टीची कथा प्र. ५ ओवी २ मध्यें उल्लेखिली आहे तिचा ज्यांत उहापोह केलेला आहे व महावाक्याचें ज्यांत सुंदर विवरण केलेलें आहे व ज्याच्या अभ्यासाचें फलित या प्रस्तावनेच्या सुरवातील दिलेल्या दोन ओव्यांत सांगितल्याप्रमाणें, प्रत्यक्ष देवाची भेट, व जनद्याचें माहिमान करून देणारें आहे, ह्या ग्रंथाच्या विषयाच्या भारदस्तपणाबद्दल आणखी प्रपंच करण्याची जरूर नाहीं. साक्षात मोक्ष प्राप्त करून देणारा असा हा ग्रंथ आहे.

हा ग्रंथ विचारिता । नाहीं ज्ञानाची दुर्लभता ।
आणि मुक्ति सायुज्यता । वेघोंचि वोळगे ॥ प्र. १।२९
येचि देहीं आपुला डोळा । जव भोगिजे मुक्तीचा सोहळा ।
तरी वैराग्याच्या तानवेळा कां सिणावें ॥ प्र. १।३०

## ग्रंथांतील विवेचन पद्धती.

गुरुशिष्य पद्धतीनें हा ग्रंथ रचला आहे.

आइते शिष्याचे आक्षेप । सिद्धचि गुरुवाक्य दीप ।
जेणें संशय तम विक्षेप । फिटती श्रोतयांचे ॥ प्र. १।२८

ही पद्धती शिष्याचे मुखानें शंका मांडून, गुरु तिचे समाधान करितात, अशा स्वरूपाची असल्यामुळें, पूर्वपक्ष व सिद्धांत, यांची जुळणी चांगली होते. ऐकणारे श्रोते मनांत जेवढे आक्षेप एखाद्या मुद्यासंबंधीं घेऊं शकतील, तितक्यांची कल्पना करून तितके शिष्याच्या मुखानें प्रश्न प्रतिप्रश्नाच्या रूपानें पुनः पुनः मांडून, गुरु त्याच्या सर्व संशयाचा निरास करतात अशी या पद्धतीची योजना, पूर्वापार पासून चालत आलेली आहे. आचार्यांच्या भाष्यांत ही पद्धती सर्वत्र अवलंबिलेली आहे. तीचेंच मुकुंदराजांनी अनुकरण केलें आहे. ह्यामुळें ग्रंथाचा विषय मनावर ठसण्यास फार सोईचें झालें आहे.

## ( ४ ) ग्रंथ मराठींत रचला

संस्कृत अथवा प्राकृत अशा कोणत्याही भाषेंत असा वेदान्तपर ग्रंथ रचण्याची, मुकुंदराजांची, सव्यसाची योग्यता होती व त्यांचे वेळीं संस्कृतांत रचना करणें हेंच खरें पांडित्याचें लक्षण, व इतर प्राकृतादि भाषांतून ती करणें

हीनपणाचें लक्षण, असें मानलें जात होतें; तरी त्यांनी मराठीचा अभिमान धरून मराठींतच विवेकसिंधूची रचना केली. कसलेंहि कठिण विषय पेलण्यास मऱ्हाठी भाषा समर्थ आहे असा त्यांचा विश्वास होता. व अनेक अज्ञजनांना ग्रंथ समजून, त्याचा आनंद लुटता यावा या इच्छेनें त्यांनी मराठीचा अवलंब केला. ते सांगतात:—

वेदशास्त्रांचा मथितार्थु । मऱ्हाटिया होय फळितार्थु ।
तरी चतुरीं परमार्थु । कां नेघावा ॥ प्र. १।१२
धुळिमाजी रत्न । भेटे न करतां प्रेत्न ।
तरि चतुरीं जतन । कां न करावें ॥ प्र १।१४
जरि रुइचे झाडीं । भरति मधाचिया कावडी ।
तरि हिंडाव्याचि आवडि । कां पडों द्यावी ॥ प्र. १।१५
जऱ्हि हे आरुष बोल । परि रोकडे ब्रह्मज्ञान हें नवल ।
तरि अवज्ञा कवण करिल । येथ विषइं ॥ १।१६
जया नाहीं शास्त्र प्रतीती । जे नेणती कर्ममुद्रेची स्थिती ।
तयालागीं मऱ्हाटिया युक्ति । केली ग्रंथ रचना ॥ प्र. १८।१५३

याप्रमाणें परमार्थाचा श्रेष्ठ लाभ अशिष्ट वाटणाऱ्या मराठी भाषेंतून जर होऊं शकतो, तर संस्कृतासारख्या कठिण भाषेचा अभ्यास करून, मग त्यांतून ज्ञानप्राप्ति करून घेण्याची एवढी उठाठेव करण्याची जरूरच काय ?

## सारांश

मुकुंदराजासारखे अधिकारी, मोक्षप्राप्ति करून देणारा विषय, श्रोत्याला निःशंक करील अशी विवेचन पद्धती, व सोपी अशी सर्वांना समजणारी मराठी भाषा, अशा चार गोष्टींचा ज्यांत संगम झाला आहे त्या विवेकसिंधूची योग्यता अतिश्रेष्ठ आहे हें कोणीही कबूल करील.

या ग्रंथाबद्दल एक आख्यायिका प्रचलित आहे. तिचा उल्लेख करतो. असे सांगतात कीं, मुकुंदराजांचा हा ग्रंथ श्रीज्ञानेश्वरांचे गुरु निवृत्तिनाथ यांना इतका आवडला कीं, त्यांनी श्रीज्ञानेश्वरांस तसा एखादा स्वतंत्र ग्रंथ निर्माण करण्यास सांगितला. व त्यावरून ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभव ग्रंथ रचला. या आख्यायिकेवरून इतका तर्क बसविण्यास हरकत नाहीं कीं, विवेकसिंधूबद्दल लोकांच्या मनांत, एके काळीं बरीच मोठी आदरबुद्धि असावी.

# प्रस्तावना ( भाग २ )

## मुकुंदराजांची थोडी माहिती

प्रस्तावनेच्या सुरवातीस सांगितल्याप्रमाणें, येथपर्यंतच्या पहिल्या भागांत छद् ग्रंथाबद्दल जें सांगावयाचें होतें तें थोडक्यांत सांगून झालें. आतां या दुसऱ्या भागांत, मुकुंदराजांची थोडी माहिती सांगण्याचें योजिलें आहे.

येथें प्रथम दर्शनींच हें सांगून टाकतों कीं, या मुद्यावर अधिकार वाणीनें सांगतां येईल असें मजजवळ कांहीं साधन नाहीं. पूर्वी या कवी संबंधानें ज्यांना लिहिण्याचा प्रसंग आला, त्यांनीं काढलेलीं अनुमानें निश्चित कोटीला अद्याप पोंचलीं नाहींत. मुकुंदराजांच्या ग्रंथांतून, जे क्वचित तुरळक उल्लेख सांपडतात, त्यावरच सर्व भिस्त ठेवतात.

नृसिंहाचा बल्लाळु । त्याचा पुत्र जैतपाळु ।
तेणें करविला रोळु । हा ग्रंथ रचनेचा ॥ विवेक प्र. ७।१५५

या ओवींशिवाय मुकुन्दमुनिकृत महाभाष्यांत अगदीं शेवटीं श्लोक आहे तो असा

सिध्येश्वन्येषु सर्वेष्वङ्घधिकृकृपापात्रमस्याभि जातो ।
ग्रंथं मद्बोधसिद्धयै कुरु बहुसुगमं ज्ञानसर्वस्वसारम् ।
एवं विज्ञापितः सन्नवनतशिरसा जित्यपालेन धीमान् ।
रुधः कृत्वा हि तस्मै सकरुणहृदयः श्रीमुकुन्दोमुनीन्द्रः ॥

यांत येणारें नांव, ' जैतपाळ ' का ' जयतूपाळ ' वा ' जित्यपाळ ', याचाच अजून ठाम निश्चय होत नाहीं. हें नांव वेगवेगळ्या ग्रंथांतून वेगवेगळें लिहिलें आहे कोणी " जयंतपाळ " हि लिहितात ( आठल्यांचें प्रतींत तसें आहे ) कोणी " जैतपाळ " लिहितात कोणी " जित्यपाळ " लिहितात. या अशा अनिश्चित नांवावरून व मुकुंदराजांनीं एका राजावर समाधीचा प्रयोग करून, त्याचेकडून अनेक विद्वान ब्राह्मणांची, चमत्कार दाखवून, सुटका केली. या आख्यायिकेचे आधारावर हा जो कोण जयत्पाळ कीं जयंतपाळ होता. तो राजा होता अशी आपली समजूत करून घेऊन, त्या नांवाचें आधारें मुकुंदराजांचा कांहीं पत्ता लागेल, म्हणून संशोधन केलें, पण अजून कोठेंच स्थिर भूमि आढळली नाहीं.

पुणें युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक श्रं. गो. तुळपुळे एम्. ए. यांनीं महाराष्ट्र साहित्यपत्रिकेच्या वर्ष २३ च्या अंक ३ मध्यें मुकुंदराजावर एक लेख लिहिला आहे, व जैतपाळाचे नांवाची हि, चर्चा केली आहे. तो त्यांचा प्रयत्न फार स्तुत्य आहे तथापि निश्चित उत्तर त्यांना देतां आलेलें नाहीं.

## मोठा महत्वाचा प्रश्न म्हणजे मुकुंदराज कोठचे ?

दोन निरनिराळीं उत्तरें, याचीं दिलीं जातात. कोणी म्हणतात ( १ ) वेतुळ जवळ खेडलें गावीं, ते होऊन गेले. कोणी म्हणतात ( २ ) जोगाईच्या आंब्यास, ते होऊन गेले. खेडलें गावास मुकुंदराजांची पहक्या किल्यात समाधि आहे व मुकुन्दराजांचे आजेगुरु हरिनाथ. यांची समाधि अंभोरें येथें असून यांचे गुरु रघुनाथ यांची समाधि छिंदवाड्यास आहे यावरून मध्य प्रांतांत ते होऊन गेले असा एक पक्ष म्हणतो, व अंभोर म्हणजे जोगाईचें आंबे, तेथें मुकुंदराजांची समाधि आहे. तेव्हां त्या प्रांतात मुकुंदराज झाले, असा दुसरा पक्ष म्हणतो. वर उल्लेखिलेल्या, प्रा. तुळपुळे यांचें साहित्यपत्रिकेंतील निबंधांत त्यांनीं स्वतः जोगाईच्या आंब्याचे परिसरांत फिरून मुकुंदराज हे जोगाईच्या आंब्याचे असावेत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

वेनगंगेच्या तिरीं । अंबा मनोहर नगरी ।
तेथें प्रगटले श्रीहरी । जगदीश्वर ॥ प्र. १८ ओ. ३८

या ओवींतील "वेनगंगेच्या" ऐवजीं "बाणगंगेच्या" असा पाठ कांहीं पोथ्यांतून आढळतो, तेव्हां "बाणगंगा" असा मूळ पाठ असावा, व बाणगंगा अंब्यास आहे. यावरून मुकुंदराज जोगाईच्या अंब्याचे असावे, असें प्रा. तुळपुळे म्हणतात.

या मुद्यासंबंधानें, इतिहासाचार्य राजवाडे यांचें काय मत होतें, हें "मुकुंदराजाचा एक संस्कृत ग्रंथ" असा मथळा असलेला त्यांचा एक लेख, पुणें भारत इतिहास संशोधक मंडळाचें जें शके १८३५ चें वार्षिक इतिवृत्त प्रसिद्ध झालें त्यांत पान १११–११५ मध्यें छापला आहे. ते लिहितातः— वेनगंगेच्या तिरीं । अंबा नाम नगरी । असे चरण विवेकसिंधूंत आहेत. ही अंबा नगरी म्हणजे भंडाऱ्याजवळील वेनगंगेच्या तीरचें 'अंभोरे', हें तीर्थ आहे तेथें हरिनाथाची समाधी आहे. त्या ठिकाणी सध्या वार्षिक उत्सव मोठ्या थाटानें होत असतो रामनाथाची समाधी बेतुल जवळ 'खेडले' या गावीं आहे. अर्थात् मुकुंदराज व ( जैतपाळ ) हा बैतुल, छिंदवाडा, अंभोरें, या वैनगंगेच्या भोवतालच्या प्रांतातील आहे. मुकुंदराजांच्या समाधीचा संबंध जोगाईच्या अंब्याशीं बिलकुल नाहीं. 'अंबा' या नावावरून जोगेश्वरीचें अंबे ( ऊर्फ मोमिनाबाद ) म्हणून जे एकदा प्रचलित केलें, तें तसेंच प्रचलित झालें. परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं. 'अंबे' म्हणजे 'अंभोरें' भंडाऱ्याजवळील नागपूर प्रांतांतील समजावयाचें. त्या प्रांतांत मुकुंदराजांची शिष्य परंपरा जयपाहि आहे"

मुकुंदराजांच्या स्थळाबद्दलच जेथें अशी अनिश्चितता, तेथें त्यांच्या चरित्राबद्दल कोण काय ठामपणें सांगू शकेल? सुमारें ६५० वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या या महानुभावाबद्दल, आपणास आज तरी अंधारांत चाचपडत रहावें लागत आहे. मुकुंदराजांच्या पूर्वजास नांदेड गांवची वंशपरंपरा वृत्ति होती. ते माध्यंदिन वाजसनेयी यजुर्वेद शाखेचे ब्राह्मण होते, ते शांकरमतानुयायी अद्वैती होते ते राजाश्रय पावलेले होते, व बरींच वर्षे जगले होते, त्यांस वृद्धापकाळीं दम्याचा विकार झाला होता. आदिनाथ हरिनाथ रघुनाथ मुकुंदराज अशी त्यांची गुरुपरंपरा होती. अशा प्रकारच्या जुळविलेल्या माहितीच्या कणांवर तूर्त निर्वाह करणें भाग आहे.

ही अनिश्चितता आतां फार काळ राहाणें शक्य नाहीं, असें मला वाटतें. कारण नागपूर व मराठवाड्यांतील विद्यालयांत असलेले साक्षेपी, मराठीचे अभिमानी, असे प्राध्यापक आपआपल्या प्रांतांत कसोशीनें संशोधन चालवून याचा छडा लवकर लावल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहींत.

## मुकुंदराजांनीं केलेले ग्रंथ

( १ ) परमामृत ( २ ) महाभाष्य ( ३ ) विवेकसिंधुतात्पर्य ( ४ ) पवनविजय ( ५ ) मूळस्तंभ असे आणखी ५ ग्रंथ त्यांनी केले होते, असा समज आहे. त्यासंबंधी थोडक्यांत माहिती देतों.

### ( १ ) परमामृत

हा ग्रंथ बराचसा महाराष्ट्राच्या वाचनांत आहे. याच्या फक्त ३२१ ओंव्या आहेत. पण हा ग्रंथ फार थोर योग्यतेचा आहे. महाराष्ट्रभाषाभूषण श्री. ज. र. अजगांवकर यांनीं, त्याची २।३ वेळां सार्थ आवृत्ति काढलेली आहे. ग्रंथाचा विषय अध्यात्मपर असून मांडणी फार ठाकठिकीची आहे. भाषा ठसकेदार आहे. विवेकसिंधुची ती लहानशी पूर्वाकृति समजली जाते.

### ( २ ) महाभाष्यम्

हा ग्रंथ संस्कृतांत लिहिलेला आहे. याचें पूर्ण नांव 'श्रीमन्मुकुंदमुनिकृतम् महाभाष्यम्' असें आहे. विवेकसिंधूंत जें ज्ञान सांगितलें आहे. तेंच या ग्रंथांत संस्कृतांत सांगितलें आहे. याचेहि, पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन विभाग आहेत. महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठक यांचे-कडून संशोधन करवून, धुळें येथील आत्माराम प्रेसमध्यें समर्थभक्त श्री. शं. श्री. देव यांनीं शके १८१५ मध्यें हा ग्रंथ छापला, व भारत इ. सं. मं. नें तो प्रसिद्ध केला. ( हल्लीं तो ग्रंथ भा. इ. मं. त आठ आण्यास मिळूं शकतो ) हा संस्कृत

ग्रंथ मुकुंदराजांनीं स्वतः केला कीं नाहीं, याबद्दल भिन्न मतें आहेत. त्याचा कर्ता त्यांचा नातु अनंत मुनी असावा असें कांहीं म्हणतात व गोपाळ मुद्गल यानें तो केला असें हि कांहींचें मत आहे.

इतिहासाचार्य राजवाडे यांस, या संस्कृत ग्रंथाची एक पोथी, वऱ्हाडांत बिबिचें कारंजे नांवाचें एक मध्यम शहर आहे तेथें सांपडली. त्यांनीं शके १८३५ च्या भा. इ. सं. च्या वार्षिक इतिवृत्तांत " मुकुंदराजाचा एक संस्कृत ग्रंथ " अशा मथळयानें त्याबद्दल एक लेख पान ११२ ते ११५ वर लिहिला आहे. त्यांत राजवाडे यांनीं, या ग्रंथाच्या कर्तृत्वासंबंधीं विवेचन केलें आहे, त्याचा सारांश असा कीः– विवेकसिंधूच्या आठव्या प्रकरणाच्या सुरवातीस जो दुसरा संस्कृत श्लोक शिष्येष्वन्येषु सत्सु... असा आहे तो महाभाष्यांतील अखेरच्या श्लोकासारखाच आहे, त्याअर्थीं या दोन्ही ग्रंथाचा कर्ता एकच मुकुंदराज आहे हें स्पष्ट आहे. जैतपालाचें नांव, मराठींत व संस्कृतांत दोन्ही ठिकाणीं येतें तेव्हां विवेकसिंधूचा जो कर्ता मुकुंदराज म्हणून प्रसिद्ध आहे, तोच या संस्कृत महाभाष्याचा हि कर्ता होय यांत बिलकुल शंका नाहीं.

या महाभाष्याचा एक हस्तलिखित पोथी सुमारें २५०।३०० वर्षांची जुनी अशी वाग्देवता मंदिरांतील कारंजें मठांतील संग्रहांत आढळली. तींत पोथीच्या शेवटीं— इति श्री सकल वेदांत मथितार्थ ब्रह्मावबोधज्ञानसागर श्री मुकुंदमुनिना वेदांतार्थ विवेक महाभाष्यं समाप्तम्। असा मजकूर आहे. यावरून हि, राजवाडे यांनीं दिलेलें मत योग्य ठरतें, व शिवाय विवेकसिंधु आधीं मराठींत रचला व नंतर त्याचें महाभाष्यांत रूपांतर केलें असेंहि ठरतें.

या महाभाष्याची एक पोथी भाण्डारकर रि. इ. मध्यें आहे. त्या पोथींतील मजकुराचें आधारें डॉ. अ. प्र. करमरकर एम्. ए. पी. एच. डी. यांनीं सन १९४५ मध्यें सह्याद्रि मासिकांत एका लेखांत असेंच मत प्रदर्शित केलें होतें. सारांश हा ग्रंथ मुकुंदराजांचाच आहे यांत संशय नाहीं.

## ( ३ ) श्रीमुकुंदमुनिराजकृत विवेकसिंधु तात्पर्य

वा. दे. मं. तील क्रमांक १३७३ च्या पोथीचें वरील प्रमाणें नांव आहे. यांत पंचीकरणाचीं व इतर कोष्टकें विवेकसिंधूचे विषय मांडणीस अनुसरून दिलेलीं आहेत व क्वचित विवेकसिंधूच्या ओंव्याहि अवतरित केलेल्या आहेत पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भागहि केलेले आहेत. विवेकसिंधूंतील कठिण भाग समजण्यास, या पोथीनें चांगली मदत होते व मी तिचा यथेच्छ उपयोग करून घेतलाहि आहे. पोथीचे शेवटीं—

इति श्री महावाक्यार्थ । गुरु परंपरा श्री आदिनाथ ।
श्री हरिनाथ । श्री मुकुंदराज ॥

असें सांगून मग

माझी अति मंद वाणी । पवित्र केली इहीं वचनीं ।
प्रीती पावो पिनाकपाणी । म्हणे मुकुंदराज ॥

अशी ओवी आहे. गरीबनाथस्वामी कृत "पंचीकृत विवेक" नावाचा ग्रंथ राजवाडे सं. मंडळ ग्रंथमालेंत १९ वा म्हणून छापला आहे. हा ग्रंथ शके १५७६ मध्यें लिहिला आहे त्यांत या विवेकसिंधुतातपर्यंतील बरीचशीं कोष्टकें अवतारित केलेली आहेत.

## ( ४ ) पवन विजय

धुळें वाग्देवता मंदिरात बाडांक १९ व १६७३ मध्यें पवन विजय ग्रंथाचा उल्लेख आहे. पण तो ग्रंथ हरिहरदास यांनीं केलेला आहे. मुकुंदराजांचा त्याचेशीं कांहीं संबंध नाहीं. या ग्रंथांत पार्वतीनें शंकराला प्रश्न विचारले आहेत. नासारंध्रातून वाहाणाऱ्या वायूच्या गतीवरून कार्यसिद्धी, असिद्धि, ठरवितां येतें, अशा प्रकारचे कांहीं अडाखे यांत सांगितले आहेत.

## ( ५ ) मूळस्तंभ

वाग्देवता मंदिरांतील बाडांक २८६,१२२१, १२४९, १५०२ व १७१७ यांत या ग्रंथाचा उल्लेख आहे. पण तो दत्तात्रय अवधूत यांनीं केलेला आहे. त्याचेशीं मुकुंदराजांचा कांहीं संबंध दिसत नाहीं. या ग्रंथाचे ७ अध्याय आहेत. त्यांत पृथ्वीची उत्पत्ति, पिंडब्रह्मांड रचना, षट्चक्रें, त्रिगुण, दशपवन व त्यांचीं स्थानें दशदेह, चंद्राच्या कला, पांचमुद्रा, सप्तसागर देहांतील अष्टाचळ सप्त पातळें व २१ स्वर्ग इत्यादि विषय आहेत.

पवनविजय व मूलस्तंभ हे ग्रंथ मुकुंदराजांचे नव्हत असें विद्वान संशोधकांचें मत झालेलें आहे, तें योग्य वाटतें.

## मुकुंदराजांचा काळ

मुकुंदराजांचा काळ ठरविण्यापूर्वीं, दुसऱ्याच एका प्रश्नाचा प्रथम निकाल लावणें जरूर आहे. तो प्रश्न विवेकसिंधूच्या १७ व्या प्रकरणाचे दोन निरनिराळे प्रकार आढळ्यामुळें उत्पन्न झाला आहे. मागें एके ठिकाणीं, ठळक फरक सांगतांना हे दोन प्रकार मी नजरेस आणले आहेत व एका गटास ( अ ) व दुसऱ्यास ( ब ), अशी विवेचनास सोईस्कर पडावें म्हणून त्यांना नांवें दिलीं आहेत.

( अ ) प्रकरणांत ३७ ते ४० ओव्या असून त्यांत सच्चिदानंदपदत्रयाचें व्याख्यान, 'सत्' म्हणजे ब्रह्म 'चित्' म्हणजे माया व 'आनंद' म्हणजे ईश्वर असे अर्थ देऊन, केलेलें आहे या पदांचे हे अर्थ नित्याच्या प्रघाताला सोडून आहेत. व मुकुंदराजांच्या विवरण- पद्धतीला विसंगत वाटतात या '( अ ) प्रकरणाचा' मागल्या १६ व्या व पुढल्या १८ व्या प्रकरणाशीं नीट सांधा जुळतहि नाहीं. मोठ्या म्हणजे ५१ ते ५८ ओव्यांच्या प्रकरणाची सांगड मागील पुढील प्रकरणाशीं बरोबर जमते. १६ वें प्रकरणांतील ११९ ओवींत

मग जीव ईश्वरु । हाहि जेथें वेव्हारु ।
नाहीं तें निर्विकारु । परब्रह्म तूं ॥ ११९ ॥
ऐसें स्वस्वरूप निरोपितां । शिष्यासी तन्मयता ।
मग तूष्णींभूत जाला वक्ता । गुरु चक्रवर्ती ॥ १२० ॥

म्हणजे शिष्याची ब्रह्मानंदीं टाळी लागली व गुरु स्तब्ध झाले. असा निरुपणाचा ओघ आला आहे. पुढल्या १७ व्या प्रकरणांतील पहिली ओवी मागील ओघाला धरून लिहिली कीं,

आतां इये निरूपणीं । जीवशिव गेले हारपूनी ।
तें उरले निदानीं । आत्मरूप ॥ १ ॥

पुढें म्हणतात-

तें तुज अनुभविलें । पुसणें सांगणें नाहीं उरलें ।
तथापि प्रांजळ करूनि सांगितलें । पाहिजे तरी ऐक ॥ २ ॥

पण हे बोलणें तिसऱ्या ओवींत म्हटल्याप्रमाणें "मौनमुद्रा न मोडे" अशा रीतीनें आहे. असा सांधा जुळवून, सच्चिदानंद पदत्रयाच्या व्याख्यानाला सुरवात केली आहे. हा जसा या मोठ्या प्रकरणाचा प्रारंभ जुळून आहे त्याचप्रमाणें

याकागीं मूळगुरु आरंभून । कीजेल पूर्वजांचें कथन ।
आणि सांगिजेल त्यांचे आचरण । म्हणे मुकुंदराज योगी ॥ ५१ ॥

असा १७ व्या प्रकरणाचा शेवट करून, अठराव्या प्रकरणाची पहिली ओवी,

परमात्मा सर्वेश्वरु । जो सर्वज्ञ परात्परु ।
तोचि एक आदि गुरु । सकळ जीवांसी ॥ प्र. १८ । १

अशी रचून मूळ गुरुपासून परंपरा सांगण्यास सुरवात केली आहे. यामुळें तेथेंहि बरोबर सांधजोड होतें. लहान ( अ ) प्रकरणाच्या ओव्या, मागील व पुढील प्रकरणाशीं अशा जमत नाहींत. दोन्ही प्रकरणें या ग्रंथांत दिलीं आहेत, तीं पाहून वाचकांनीं आपली खात्री करून घ्यावी शिवाय लहान प्रकरणांत सत्, चित्, आनंद या तीन पदांचे जे अनुक्रमें ब्रह्म, माया व ईश्वर असे अर्थ केले आहेत तसे अर्थ " महाभाष्यांत " केलेले नाहींत. यावरून असा निश्चय करतां येतो कीं, मोठें ( ब ) प्रकरण मुकुंदराजांचें असून लहान ( अ ) प्रकरण प्रक्षिप्त असावें. सत्राव्या प्रकरणाचा याप्रमाणें निकाल लागल्यावर, आतां मुकुंदराजांचा काळ ठरविण्याच्या मुख्य मुद्याकडे वळूं.

## मुकुंदराजांच्या कालासंबंधीं विद्वानांचीं मतें

मुकुंदराज केव्हां होऊन गेले याबद्दल अभ्यासकांत बराच मतभेद आहे. शके ९०० पासून शके १२०० चा पूर्वार्ध म्हणजे ३००।३५० वर्षांपर्यंत त्यांच्या अस्तित्वाचा काल हेलकावे खात आहे. कांहींचीं मतें खालीं देतों.

| नांव | | काल |
|---|---|---|
| १ के. श्री. नारायणराव पावगी | — | शके ९७७ चे सुमारास |
| २ ,, ,, पांगारकर | — | शके १०५० ते ११२० ज्ञानेश्वरापूर्वी शंभर वर्षे |
| ३ ,, ,, भावे ( महाराष्ट्र सारस्वतकर्ते ) | — | शके १११२ चा सुमार |
| ४ ,, ,, जनार्दन बाळाजी मोडक | — | शके ११२३ मध्यें मुकुंदराज हयात होते. |
| ५ ,, ,, इतिहासाचार्य राजवाडे | — | शके ११५८ ते १२५८ या काळांत होऊन गेले. |
| ६ ,, ,, भारद्वाज | — | ज्ञानेश्वरानंतर बऱ्याच वर्षांनीं. |
| ७ ,, ,, वामन दाजी ओक | — | सुमारें सातशें वर्षांपूर्वी. |
| ८ विद्यमान श्री. आजगावकर | — | बाराव्या शतकाचे पूर्वार्धांत ज्ञानेश्वरानंतर. |

## तीन मतभेद दिसतात

विद्वानांनीं बनविलेलीं वरील मतें व दिलेले शकांचे आंकडे पाहातां, मुकुंदराज ( १ ) ज्ञानेश्वरापूर्वी बरीच वर्षे होऊन गेले, ( २ ) ज्ञानेश्वर व मुकुंदराज समकालीन असावेत, ( ३ ) मुकुंदराजाचे पूर्वी ज्ञानेश्वर बरीच वर्षे झाले असावेत. वरील लेखकांनीं, आपण अमुक काल कां मान्य मानतों, यांचे विवेचन केलें आहे तें जिज्ञासूंनीं त्यांच्या त्यांच्या लेखांतून

वाटल्यास पहावें. ज्ञानेश्वर व मुकुंदराज, यांच्या ग्रंथांतील विषयविवेचनावरून, आपलें मत बनविण्याचा फारसा कोणी प्रयत्न केल्याचें, दिसून येत नाहीं; परंतु उभयतांचे ग्रंथ ताडून पाहिल्यास, कालानुक्रम ठरविण्यास साधन उपलब्ध होण्यासारखें आहे, असें मला वाटतें. म्हणून त्याचा थोडक्यांत उल्लेख करतों.

ज्ञानेश्वरांचा 'अमृतानुभव' व मुकुंदराजांचा 'विवेकसिंधु' हे दोन्ही ग्रंथ फार उच्च प्रतीचें आहेत. आमच्या मतें तर ज्ञानेश्वर व मुकुंदराज समकालीन असें होऊन गेले असें मानण्यास या दोन ग्रंथांत अंतस्थ अशी दोन प्रमाणें आहेत तीं विद्वानांच्या पुढें विचारार्थ मांडतों.

## प्रमाण पहिलें

ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवांतील पहिलें 'शिवशक्ति समावेश' प्रकरण, व मुकुंदराजांच्या विवेकसिंधूंतील " सर्व ब्रह्म " नांवाचें सातवें प्रकरण, यांत कांहीं ठिकाणीं इतकें विलक्षण कल्पनासाम्य आहे कीं, तें पाहून, या दोघां कवींपैकीं, कोणीतरी एकानें दुसऱ्याच्या कल्पना उचलल्या आहेत, असें म्हणण्याकडे कल होतो.

ताडून पाहण्यास सोईचें पडावें म्हणून त्या ओव्या अवतरित करतों.

| ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवांतील ओव्या | मुकुंदराजांच्या विवेकसिंधूंतील ओव्या |
|---|---|
| आवडीचेनि वेगें । एकएकातें गिळिती अंगें । कीं द्वैताचेनि पांगें । उगाळिते आहाती ॥ प्र. १ ओ. ३ | तैसी आत्मयाच्या अंगीं । अज्ञानशक्ति तन्वंगी । उठूनि तयातें आलिंगी । तो न सुटेचि जैसा ॥ प्र. ७ ओ. ११२ |
| कैसी स्वसुखाची आलुकी । जे दोनीपण मिळोनि एकी । नेदितीच कवतकीं । एकपण फुटों ॥ प्र. १ ओ. ५ | तियेचेनि वालभें । तो तियेते न विसंभे । आपणातें करी उभे । तियाचि तो ॥ प्र. ७ ओ. ११३ |
| देवें संपूर्ण देवी । जियेवांण कांहीं ना तो गोसावी । किंबहुना एकोपजीवी । एक एकाचीं ॥ प्र. १ ओ. १० | तियेच्या गुणी भुलला । आपणपें तेचि झाला । ऐसा घराचार मांडला । तयां दोघां ॥ प्र. ७ ओ. १२४ |

जिहीं एक एकाविण । न कीजे तृणाचेंहि निर्माण । जिये दोघें जीवप्राण । जियां दोघां ॥
प्र. १ ओ. १२

जे वीं भातारावें दिसणें । भातारू जियेचे असणें । नेणिजती दोघां- जणें निवडूं जियें ॥ प्र. १ ओ. २२

हा ठायींवरी वियोग भेडें । बाळ तरी जगाएवढें । वियाली परी न मोडे । दोघुलेंपण ॥ प्र. १ ओ. ६

ते सगुण वनिता । तो निर्गुण भर्ता । तरी दोघां एकोपजीविता । नवल तयाचें प्र. ७ ओ. १२५

ते ना तो न वोळखिजे । येरयेरी होऊन असिजे । आतां केसेनि । सुटिजे । आत्मेन जी ॥
प्र. ७ ओ. १२६

पुरुषाचेनि संगें सुंदरा । जाली ते गरोदरा । पंचविसा कुमारा । प्रसवती जाली ॥ प्र. ७ ओ. १२७

केवळ मर्यादा लक्षांत घेऊन, आम्ही वरील ओव्या उद्धृत केल्या आहेत. परंतु अमृतानुभवाच्या पहिल्या प्रकरणात याच धर्तीवर आणखी कांहीं ओव्या आहेत त्या, मुकुंदराजांच्या सातव्या प्रकरणांत ज्या पुरुष प्रकृतीचें रूप सांगण्याकरितां १२० ते १३० पर्यंत ओव्या आहेत, त्यांच्याशीं ताडून पाहिल्यास, असें स्पष्ट दिसून येतें की- ( १ ) पुरुष प्रकृतीचें – शिव – शक्तीचें अनिवार प्रेम ( २ ) एकाच घरांत म्हणजे पिंडांत, अगर ब्रह्मांडांत, दोघांची मेहूण म्हणून नांदणूक, ( ३ ) पुरुषाला प्रकृतीनें भुलविणें, ( ४ ) एकमेकांस एकमेकांवांचून न करमणें, ( ५ ) एकमेकांपासून निवडतां न येणें, ( ६ ) प्रकृतीला जगाएवढें बाळ अथवा पंचवीस कुमार होणें.

अशा स्वरूपाच्या कल्पनांचे, एकाच विषयाच्या विवेचनांत, उभयतांच्या काव्यांत उमटून पडणारें, असें विलक्षण साम्य आहे. इतकेंच नव्हे तर क्वचित शब्दसाम्यहि 'एकोपजीवी' 'प्रसवणें' ( वियाली ) अशा शब्दांत दिसून येतें.

अशा या एकसारख्या कल्पना, दोघां कवींस स्वतंत्रपणें स्फुरल्या, असें मानण्यास मन धजत नाहीं. कोणी तरी, दुसऱ्याचा अनुवाद केला आहे असेंच वाटतें. अमृतानुभवांतल्या ओव्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकांस ज्ञानेश्वरी ठशाच्या आहेत, त्या उसनवारीच्या नाहींत, हें तेव्हांच पटेल. घरगुती अथवा रोजच्या ग्रामीण जीवनांतले अगदीं बाळबोध दाखले

देऊन, कठीण असे वेदांत विषय सुलभ रीतीनें समजून देण्याची हातोटी, ज्ञानेश्वरांशिवाय इतर कोणासच साधलेली नाहीं. मुकुंदराजांचा योग्य तो मान राखून, आम्हांस असें म्हणावेसें वाटतें कीं, ज्ञानेश्वरांचा हा, पतिपत्नीच्या प्रीतीचा दाखला. शिवशक्तीच्या एकमेकांवर होणाऱ्या विलासाची कल्पना आणून देण्यास, फारच समर्पक आहे, असें मुकुंदराजांस वाटून, त्यांनीं ती कल्पना उचलली व प्रसंग आला तेव्हां तिचा उपयोग केला.

वरील विवेचनावरून ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवाची रचना आधीं झाली व नंतर विवेकसिंधुची झाली असें मानणेंच बरोबर होईल, असें वाटतें, असो.

## प्रमाण दुसरें

अमृतानुभवाचे पांचवे प्रकरणांत, 'सत्' 'चित्' "आनंद" या पदत्रयाचें विवरण केलें आहे. नेमक्या त्याच पदाचें विवरण मुकुंदराजांच्या विवेकसिंधूमध्यें हि प्रकरण १७ मध्यें आलें आहे. ज्ञानेश्वर असें प्रतिपादन करीत आहेत कीं:—सत् चित् आनंद या तीन पदांची तीन स्वरूपें, निराळीं आहेत, असें वाटतें. पण तसें नसून तीन पदें मिळून एक सच्चिदानंदरूप परमात्माच सिद्ध होतो.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कांति, | काठिण्य, | कनक | या तिन्ही मिळून जसें एक | सुवर्णच आहे. |
| द्राव, | गोडी, | पीयुख | ,, ,, ,, | अमृतच आहे |
| उजाळ, | द्रुति, | मार्दव | ,, ,, ,, | जसा कापूरच आहे |

उदकाचें थेंब पडत असतां एक थेंब दोन थेंब असें कितीहि मोजतां आलें तरी, खालीं पडलेले एक उदकच असतें ह्याप्रमाणें आत्मा हा सत् चित् आनंद अशा तीनपणावांचून एक असा आहे. ( अमृतानुभव प्र. ५ ओंवी १ ते ९ पहा ) हाच अर्थ पटवून देण्यास मुकुंदराजांनीं ज्ञानेश्वरांचीच पद्धति स्वीकारली आहे कशी ती पहा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| शुद्ध | तेजोमय, | उष्ण | मिळून | एक | जसा | सूर्य |
| शुद्ध, | प्रकाशमय, | शीतल | ,, | ,, | ,, | चंद्र |
| श्वेत, | नम्र, | मधुर | ,, | ,, | जशी | साखर |
| आरक्त, | घन, | किरण फाकती | ,, | ,, | जसें | रत्न |
| हिरवी, | सघन, प्रभा फाके हारीत वर्ण | | ,, | ,, | जशी | पाच |
| पिवळा, | सुगंधी, | अमृतस्वादु | ,, | ,, | जसा | आंबा |
| काळी, | कठीण, | सुलक्षचक्रयुक्त | ,, | ,, | जशी | गंडकी |
| सावळी, | सुगंधी, | स्वादिष्ट | ,, | ,, | ,, | तुळस |

( विवेकसिंधु प्र. १७ ओव्या १४ ते २१ )

याविषयीं ज्ञानेश्वरांनीं दिलेल्या कापुराचाच दृष्टांत उचलला आहे तो असाः—

शुभ्र तोचि मृदु । मृदु तोचि मकरंदु ।
परी कर्पूर तंव अभेदु । एकला असे ॥
( विवेकसिंधु – प्रकरण १७ ओवी १७ )

दोन्ही कवींची, एकच विषय सुलभ करण्यासाठीं दिलेलीं हीं उदाहरणें, एकाच धोंचाचीं यदृच्छेनें स्वतंत्रपणें आलीं असें म्हणवत नाहीं. अमृतानुभव प्र. ५ ओव्या १०, ११, १२, १३ खालीलप्रमाणें आहेत.

तैसे असताचिया व्यावृत्ति । सत् म्हणों आले श्रुती ।
जडाचिया समाप्ति । चिद्रूप ऐसें ॥ १० ॥
दुःखाचेनि सर्वनाशें । उरलें तें सुख ऐसें ।
निगदिजे मिथ्यासें । प्रभूचेनि ॥ ११ ॥
ऐसीं सदादि प्रतियोगियें । असदादि तिन्ही इयें ।
कोटितां जाली आये । सत्त्वादिकें ॥ १२ ॥
एवं सच्चिदानंद । आत्मा हा ऐसा शब्द ।
तो अन्यव्यावृत्तिसिद्ध । वाचक नव्हे ॥ १३ ॥

या ओव्या लक्षांत घेऊन मुकुंदराजांच्या विवेक० प्र. १७ मधील पुढील ओव्या वाचाव्या.

ग्रंथांतरीं निरूपण ऐसें । जें असज्जड दुःख असे ।
तयाचेनि निरासें । सच्चिदानंद ॥ प्र. १७।२३
तरी असज्जड दुःख नासे । ब्रह्म आलें सच्चिदानंद दशे ।
ऐसें म्हणतां आलें हांसें । महानुभावा ॥ प्र. १७।२४
अहो ब्रह्म सच्चिदानंद नसतें । तरी असदादि कासयानें निरसतें ।
म्हणूनि हे आहे ते । सच्चिदानंद ॥ प्र. १७।२५

विवेकसिंधूच्या प्र. १७ मधील २३ व्या ओवींत मुकुंदराज ज्याचा, 'ग्रंथांतरीं' म्हणून उल्लेख करीत आहेत, तो ग्रंथ कोणता असावा? असा येथें प्रश्न उभा राहतो.

जो कोणता ग्रंथ असेल त्यांत, असत् जड व दुःख यांचा सत्, चित्, आनंद या तीन पदांनीं, निरास केल्याचें सांगितलेलें असलें पाहिजे, व या रीतीनें 'सच्चिदानंद' अन्यव्यावृत्तिसिद्ध होतें, असें म्हटलेलें असलें पाहिजे हें उघड

आहे. आमच्या मतें ज्या अर्थी अमृतानुभवांत तसें स्पष्ट सांगितलेलें आहे म्हटलें आहे, त्याअर्थी मुकुंदराजांच्या मनश्चक्षूंपुढें, ज्ञानेश्वरांचा अमृतानुभवच होता, यांत तिळमात्र शंका राहात नाहीं. अर्थात् अमृतानुभवांतील वरील ओंव्या प्रथम जन्मास आल्या व नंतर मुकुंदराजांच्या ओंव्या रचल्या गेल्या असें झालें असलें पाहिजे.

इतिहासाचार्य राजवाडे यांच्या, मुकुंदराजांवरील ज्या निबंधाचा वर उल्लेख आला आहे, त्यांतच ते म्हणतात कीं—मुकुंदराज व ज्ञानेश्वर या दोघांत ४० वर्षांहून जास्त अंतर नसावें.

श्री. राजवाडे यांनीं, जी जुनी ज्ञानेश्वरी छापली आहे ती त्यांनीं मुकुंदराजांनीं करवून घेतलेल्या एका सुंदर नकलेवरून तयार केली. तिला " मुकुंदराजांची प्रत, " असेंच, आपल्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत त्यांनीं नांव दिलें आहे व ती प्रत शके १२१२ पासून १२४० पर्यंतच्या काळांत केव्हां तरी लिहिलेली आहे असा राजवाड्यांचा त्या प्रतीबद्दल अभिप्राय आहे. ( पाहा राजवाडे ज्ञानेश्वरीची प्रस्तावना पान ६९ ).

वरील एकंदर विवेचनावरून असा निष्कर्ष काढतां येतो कीं:—

१ मुकुंदराज हे ज्ञानेश्वरांचे पूर्वी कांहीं वर्षे, व नंतरहि कांहीं वर्षे हयात असावे.

२ या उभयतांच्या आयुष्यांत, असा एक कालखंड संभवतो कीं ज्यावेळीं दोघे हि स्वतंत्रपणें काव्यरचना करीत होते.

३ मुकुंदराजांच्या वाचनांत, ज्ञानेश्वरांची सर्व कविता आली होती. ज्ञानेश्वरांच्या कांहीं कल्पना उचलण्यांत त्यांस हरकत वाटली नाहीं व जेथें मतभिन्नता आढळली तेथें तिचा निरास करण्यासहि त्यांना संकोच वाटला नाहीं ज्ञानेश्वरांच्या रचनेविषयीं त्यांचें मनांत आदरबुद्धि असावी, व म्हणूनच त्यांनीं ज्ञानेश्वरीची सर्वोत्तम अशी नक्कल करून ठेवली असावी. मुकुंदराजांच्या काव्याबद्दल ज्ञानेश्वरांचें काय मत होतें हें कळण्यास मात्र कांहीं साधन नाहीं.

## आद्य कवीचा मान कोणाचा ?

या प्रश्नाला सुमारें पन्नास वर्षांपूर्वीच, कै. श्री. वि. गो. विजापूरकर हे ग्रंथमाला काढीत असत, त्या मालेंतील एका निबंधांत, इतिहासाचार्य राजवाडे यांनीं उत्तर देऊन टाकलें आहे. ते म्हणतात " मराठी भाषेचा आद्य ग्रंथकार ज्ञानेश्वर नाहीं व मुकुंदराज हि नाहीं. या दोघाच्या हि पूर्वी, निवृत्ति, गैनी, हेमाडि, वगैरे सनातन धर्मीयांनीं व चक्रधरादि महानुभाव व जैन यांनीं, ग्रंथरचना केली होती. यामुळें हा प्रश्न अप्रस्तुत होतो.

या दोघांपैकीं ग्रंथकर्तृत्वांत पूर्वापर कोण, हा प्रश्न मात्र प्रस्तुत असून सोडविण्याला शक्य आहे."

मुकुंदराजांना दीर्घायुष्य लाभलें व ज्ञानेश्वरांचे आधीं व नंतर हि ते विद्यमान होते, यावरून मुकुंदराजांचें ग्रंथकर्तृत्व, ज्ञानेश्वरांच्या ग्रंथकर्तृत्वाच्या आधीं झालें असल्याचा बराच संभव आहे. यामुळें नुसत्या पूर्वापरतेचा विचार करणें झाल्यास, आधीचें ग्रंथकर्तृत्व मुकुंदराजांचें व नंतरचें ज्ञानेश्वरांचें असेंच ठरविणें योग्य होईल.

## शके १११० च्या उल्लेखाची वाट काय?

विवेकसिंधूच्या कांहीं पोथ्यांत—

> शके अकराशें दाहोत्तरू । साधारण संवत्सरू ।
> राजा शार्ङ्गधरू । राज्य करी ॥
> ऐसा समयो सर्वोत्तमु । तेथ मुकुंद द्विजोत्तमु ।
> विवेकसिंधु मनोरमू । निर्मिता जाला ॥

अशा ओव्या आहेत असें म्हणतात. (मला ह्या ओव्या एकाहि पोथींत आढळल्या नाहींत) व ह्यावरून मुकुंदराज आद्यकवि होत असें कांहींचें मत आहे. परंतु या ओवींतील साधारणसंवत्सर शके १११० ला येत नाहीं असा आक्षेप महाराष्ट्र सारस्वतकर्ते के. भावे यांनी घेतला आहे व तसेंच प्रो. आर. डी. रानडे पी. एच. डी. यांचे हि मत आहे. यावरून ह्या उल्लेखाला किंमत राहात नाहीं.

अलिकडे रा. रा. ना. कृ. खाजगीवाले यांनी श्रीपरमामृतरहस्य नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यांचें बाळकृष्ण महाराज पराडकर, यांचेजवळ गुरुपरंपरेनें आलेली, परमामृताची एक फार जुनी पोथी होती. ती त्यांनीं श्री. खाजगीवाले यांस दिली होती. ती पोथी, एका यात्राप्रवासांत चोरीस गेली. परंतु त्या पोथीची अक्षरशःप्रमाणें नक्कल करून ठेवलेली होती. मूळच्या पोथींत शेवटीं १७ वी ओवी होती ती अशी :—

> शके अकराशें दाहोत्तरीं । श्री अंबानामनगरीं
> परमामृत ग्रंथ निर्धारीं । प्रगट झाला ॥

ही हकीकत श्री. खाजगीवाले यांचे ग्रंथाचे प्रस्तावनेंत आहे. अशा प्रकारच्या पुराव्याला कोणी फारशी किंमत देत नाहीं; यामुळें तो पुरावा बाजूस ठेवणें अयोग्य होणार नाहीं, असें वाटतें.

श्री. राजवाडे यांना, जी ज्ञानेश्वरीची मुकुंदराजांनी करविलेली, सुंदर प्रत मिळाली, म्हणून वर एके ठिकाणीं सांगितले आहे त्या प्रतींत, ग्रंथाच्या शेवटच्या ९२ ओवीच्या खालीं एक संस्कृत श्लोक आहे तो असाः—

श्री सद्गुरु मुकुंदेन दत्ता ज्ञानेश्वरी शुभा ।
विद्याधराय शिष्याय स्त्रीये स्वत्वं न शोभते ॥

या श्लोकावरून, राजवाडे असें निगमन काढतात कीः— " मुकुंदराजांनीं तयार करविलेली सुंदर प्रत त्यांनीं विद्याधर नामक शिष्याला दिली. श्लोकांत आलेला ' मुकुंद ' मुकुंदराज ज्यास म्हणतात तोच होय. दुसरा कोणी मुकुंद शक १२१२ ते १२४० पर्यंत हयात नव्हता. " ( पहा राजवाडे ज्ञानेश्वरी प्रस्तावना पान ६८ )

शके १२१२ त झालेली ज्ञानेश्वरी, मुकुंदराज आपल्या शिष्याला जर देतात, तर ते शके ११९० होते हें म्हणणें अगदींच विसंगत होतें, हें स्पष्ट आहे.